loknayak 30.08.2026 Copy:Copy of Layout 1 8/30/2026 12:03 AM Page 1

बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमआएर / २०१४/ ५८०९० → रविवार दि ३० ऑगस्ट २०२६ → वर्ष १० वे → अंक -१३० → पाने ४ → किंमत २ रु

Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Sunday Date: 30 August 2026 → 10 th Year → 04 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक

# लोकनायक

संपादक - भारत गायकवाड

# महाराष्ट्र सरकारचे अपयश!



**मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आपल्या विविध मागण्यांसाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. मागण्या मान्य न झाल्यास २९ ऑगस्टपासून पुन्हा उपोषणाला बसणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे. त्यांनी आजपासून पुन्हा एकदा उपोषणाला सुरुवात केली आहे. आंतरवाली सराटीमध्ये त्यांचं आंदोलन सुरू आहे. मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला पंधरा दिवसांचा वेळ दिला आहे. जर येत्या पंधरा दिवसांमध्ये आमच्या मागण्या मान्य नाही झाल्या तर १२ सप्टेंबरला आम्ही मराठा समाजाची बैठक बोलावू आणि त्यामध्ये मुंबईमधील आंदोलनाची घोषणा करू असा इशारा मनोज जरांगे पाटील यांच्याकडून देण्यात आला आहे.**



**लोकनायक वृत्तसेवा –**
दरम्यान मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी यावेळी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. हे महाराष्ट्र सरकारचे अपयश आहे. इथे प्रत्येक गोष्टीसाठी उपोषण करावं लागत आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी उपोष, पेपरफुटीसाठी उपोषण, जरांगे पाटील देखील उपोषण करत आहेत, उपोषण केल्याशिवाय सरकार ऐकतच नाही.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार अशी चर्चा आधून -मधून सुरू असते, यावर देखील सुप्रिया सुळे यांनी यावेळी प्रतिक्रिया दिली आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील का? असा प्रश्न त्यांना यावेळी विचारण्यात आला होता. यावर बोलताना त्या म्हणाल्या की, राष्ट्रवादी एकत्रच आहे. आमचा पक्ष एकत्रच आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा एकच पक्ष आहे. पक्षाचा फाउंडर मेंबर कोण आहे? पक्षाचा फाउंडर प्रेसिडेंट कोण आहे? तर शरद पवार आहेत. चुकीच्या पद्धतीने तो पक्ष त्यांच्याकडून काढून घेण्यात आला. जर तुम्ही पक्षाचं संविधान पाहिलं तर शरद पवार यांच्यावर अन्याय झाल्याचं दिसून येईल.

हा देश कोणाच्या मन मर्जीने चालत नाही. तो संविधाने चालतो. पक्षाचं काय करायचं? पक्ष कोणाला द्यायचा? पक्षाचं नेतृत्व कोण करेल हे ठरवण्याचे सर्व अधिकार शरद पवार यांचे आहेत. चुकीच्या पद्धतीने संविधानाची चिरफाड सुरू आहे. जो अन्याय शरद पवारांवर झाला परत दुसऱ्या कोणावर होऊ नये.दरम्यान मनोज जरांगे पाटील यांच्या




# सांगलीत आज शिवराज काटकर स्वीकारणार राष्ट्रीय अध्यक्षपद

## पश्चिम महाराष्ट्र मेळाव्यास राज्यातील ५०० हून अधिक पत्रकारांची उपस्थिती

**लोकनायक वृत्तसेवा –**
मराठी पत्रकारितेतील निर्भीड, अभ्यासू आणि मूल्यनिष्ठ संपादक म्हणून ओळखले जाणारे दैनिक तरुणभारत संवादचे संपादक शिवराज (आण्णा) काटकर उद्या, रविवार दि. ३० ऑगस्ट रोजी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा स्वीकारणार आहेत.

सांगलीतील विश्रामबाग येथील कृष्णा मॅरेज हॉलमध्ये होणाऱ्या या दिमाखदार पदग्रहण सोहळ्यासह मराठी पत्रकार परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, राज्यातील ५०० हून अधिक पत्रकार उपस्थित



राहणार आहेत. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न सांगली जिल्हा मराठी पत्रकार संघ आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या संयुक्त विद्यमाने या भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

### दिवसभर पत्रकारांसाठी विविध कार्यक्रम

**सकाळी पत्रकार प्रशिक्षण कार्यशाळा, राष्ट्रीय कार्यकारिणीची सभा आणि शिवराज काटकर यांचा पदग्रहण सोहळा होणार आहे. दुपारी मुंबई प्रेस क्लबच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा तसेच सांगली जिल्ह्यातील संपादकांचा सत्कार करण्यात येईल. त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील पत्रकारांचा मेळावा होऊन पत्रकारितेतील विविध प्रश्नांवर चर्चा केली जाईल. प्रशिक्षण कार्यशाळेतील सहभागी पत्रकारांना प्रमाणपत्र वितरण करून कार्यक्रमाचा समारोप होणार आहे.**

रायगड येथे नियोजित पदग्रहण सोहळा रद्द झाल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्ष शिवराज काटकर यांचा पदग्रहण समारंभसांगलीत होत असल्याने पत्रकार जगताचे विशेष लक्ष या सोहळ्याकडे लागले आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद ही मराठी पत्रकारांची ८४ वर्षांची गौरवशाली परंपरा असलेली मातृसंस्था आहे. या संस्थेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी काटकर यांची निवड ही त्यांच्या चार दशकांहून अधिक काळाच्या निर्भीड, तत्त्वनिष्ठ **पान २ वर**












loknayak 30.08.2026 Copy:Copy of Layout 1 8/30/2026 12:03 AM Page 2



# माझ्या बहिणींना कधीही एकटं पडू देणार नाही

## यवतमाळातील बहिणींच्या राख्या पोचल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी

**लोकनायक वृत्तसेवा –**
'यवतमाळ जिल्ह्यातील लाडक्या बहिणी कायमच माझ्या आणि शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. बहिणींच्या या प्रेमाने तळागळातील लोकांसाठी, बहिणींसाठी उत्साहने काम करण्याची ऊर्जा मिळते. भविष्यातही बिकट आणि कठीण प्रसंगात हा भाऊ बहिणींच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. माझ्या बहिणींना कधीही एकटं पडू देणार नाही', अशी भावना व्यक्त करत शिवसेना पक्ष मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रक्षाबंधनानिमित्त पालकमंत्री संजय राठोड यांच्याशी व्हिडीओ कॉलवर संभाषण करताना यवतमाळातील लाडक्या बहिणींप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

रक्षाबंधनाचा सण शिवसेना महिला आघाडीच्या वतीने यवतमाळात शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी पालकमंत्री संजय राठोड यांना राखी बांधण्यासाठी हजारो महिलांनी हॉटेल समर्थ प्राईडमध्ये हजेरी लावली. येथे शिवसेना पक्ष मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतीकात्मक पोस्टरला बहिणींनी राखी बांधली. या सर्व राख्या गोळा करून, शिवसेना महिला आघाडी जिल्हा संघटिका वैशाली मासाळ, दर्शना इंगोले आणि ज्योती वाघाडे या शुक्रवारीच विमानाने थेट मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानी पोहोचल्या. तेथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राखी बांधून यवतमाळातील लाडक्या बहिणींकडून शुभेच्छा दिल्या. यवतमाळ जिल्ह्यातील लाडक्या बहिणींची ही माया अनुभवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भारावून गेले. बहिणींनी प्रमाने पाठविलेल्या या राख्या आणि शुभेच्छा पत्रे बघून त्यांनी दर्शना इंगोले यांच्या मोबाईलवरून पालकमंत्री संजय राठोड यांना थेट व्हिडीओ कॉल करून संवाद साधला व जिल्ह्यातील बहिणींना शुभेच्छा दिल्या.

शिवसेना महिला आघाडीने शुक्रवारी यवतमाळात रक्षाबंधन सोहळा साजरा केला. यावेळी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या वतीने उपस्थित भगिनींना विशेष पाहुणचार करण्यात आला. पालकमंत्री संजय राठोड यांच्यासह शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी लाडक्या बहिणींना आग्रहाने भोजन वाढले. भावांच्या या पाहुणचाराने उपस्थिती बहिणी भारावून गेल्या होत्या.

यवतमाळ येथील हा रक्षाबंधन सोहळा पार पडल्यानंतर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतिमेला बांधलेल्या राख्या व महिलांनी तयार केलेले शुभेच्छा पोस्टकार्ड घेवून शुक्रवारी सायंकाळी विमानाने मुंबईकडे रवाना झाल्या होत्या. तेथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी झालेल्या आदरातिथ्याने या भगिनी भारावून गेल्या. रात्री उशिरापर्यंत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी रक्षाबंधन सोहळा सुरू होता. यावेळी हजारो महिलांनी त्यांना राखी बांधण्यासाठी गर्दी केली होती. या प्रत्येक बहिणीशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपुलकीने संवाद साधत त्यांचे




आदरातिथ्य केले. पालकमंत्री संजय राठोड यांच्या प्रोत्साहनामुळे थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राखी बांधण्याचे व ओवाळण्याचे सौभग्य लाभले, अशी भावना शिवसेनेच्या जिल्हा संघटिका वैशाली मासाळ, दर्शना इंगोले आणि ज्योती वाघाडे यांनी व्यक्त केली

'यवतमाळ जिल्ह्यातील लाडक्या बहिणी कायमच माझ्या आणि शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. बहिणींच्या या प्रेमाने तळागळातील लोकांसाठी, बहिणींसाठी उत्साहने काम करण्याची ऊर्जा मिळते. भविष्यातही बिकट आणि कठीण प्रसंगात हा भाऊ बहिणींच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. माझ्या बहिणींना कधीही एकटं पडू देणार नाही', अशी भावना व्यक्त करत शिवसेना पक्ष मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रक्षाबंधनानिमित्त पालकमंत्री संजय राठोड यांच्याशी व्हिडीओ कॉलवर संभाषण करताना यवतमाळातील लाडक्या बहिणींप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

रक्षाबंधनाचा सण शिवसेना महिला आघाडीच्या वतीने यवतमाळात शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी पालकमंत्री संजय राठोड यांना राखी बांधण्यासाठी हजारो महिलांनी हॉटेल समर्थ प्राईडमध्ये हजेरी लावली. येथे शिवसेना पक्ष मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतीकात्मक पोस्टरला बहिणींनी राखी बांधली. या सर्व राख्या गोळा करून, शिवसेना महिला आघाडी जिल्हा संघटिका वैशाली मासाळ, दर्शना इंगोले आणि ज्योती वाघाडे या शुक्रवारीच विमानाने थेट मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानी पोहोचल्या. तेथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राखी बांधून यवतमाळातील लाडक्या बहिणींकडून शुभेच्छा दिल्या. यवतमाळ जिल्ह्यातील लाडक्या बहिणींची ही माया अनुभवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भारावून गेले. बहिणींनी प्रमाने पाठविलेल्या या राख्या आणि शुभेच्छा पत्रे बघून त्यांनी दर्शना इंगोले यांच्या मोबाईलवरून पालकमंत्री संजय राठोड यांना थेट व्हिडीओ कॉल करून संवाद साधला व जिल्ह्यातील बहिणींना शुभेच्छा दिल्या.

शिवसेना महिला आघाडीने शुक्रवारी यवतमाळात रक्षाबंधन सोहळा साजरा केला. यावेळी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या वतीने उपस्थित भगिनींना विशेष पाहुणचार करण्यात आला. पालकमंत्री संजय राठोड यांच्यासह शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी लाडक्या बहिणींना आग्रहाने भोजन वाढले. भावांच्या या पाहुणचाराने उपस्थिती बहिणी भारावून गेल्या होत्या.

यवतमाळ येथील हा रक्षाबंधन सोहळा पार पडल्यानंतर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतिमेला बांधलेल्या राख्या व महिलांनी तयार केलेले शुभेच्छा पोस्टकार्ड घेवून शुक्रवारी सायंकाळी विमानाने मुंबईकडे रवाना झाल्या होत्या. तेथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी झालेल्या आदरातिथ्याने या भगिनी भारावून गेल्या. रात्री उशिरापर्यंत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी रक्षाबंधन सोहळा सुरू होता. यावेळी हजारो महिलांनी त्यांना राखी बांधण्यासाठी गर्दी केली होती. या प्रत्येक बहिणीशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपुलकीने संवाद साधत त्यांचे आदरातिथ्य केले. पालकमंत्री संजय राठोड यांच्या प्रोत्साहनामुळे थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राखी बांधण्याचे व ओवाळण्याचे सौभग्य लाभले, अशी भावना शिवसेनेच्या जिल्हा संघटिका वैशाली मासाळ, दर्शना इंगोले आणि ज्योती वाघाडे यांनी व्यक्त केली.बहिणी कायमच माझ्या आणि शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. बहिणींच्या या प्रेमाने तळागळातील लोकांसाठी, बहिणींसाठी उत्साहने काम करण्याची ऊर्जा मिळते. भविष्यातही बिकट आणि कठीण प्रसंगात हा भाऊ बहिणींच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. माझ्या बहिणींना कधीही एकटं पडू देणार नाही', अशी भावना व्यक्त करत शिवसेना पक्ष मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रक्षाबंधनानिमित्त पालकमंत्री संजय राठोड यांच्याशी व्हिडीओ कॉलवर संभाषण करताना यवतमाळातील लाडक्या बहिणींप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

रक्षाबंधनाचा सण शिवसेना महिला आघाडीच्या वतीने यवतमाळात शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी पालकमंत्री संजय राठोड यांना राखी बांधण्यासाठी हजारो महिलांनी हॉटेल समर्थ प्राईडमध्ये हजेरी लावली. येथे शिवसेना पक्ष मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतीकात्मक पोस्टरला बहिणींनी राखी बांधली. या सर्व राख्या गोळा करून, शिवसेना महिला आघाडी जिल्हा संघटिका वैशाली मासाळ, दर्शना इंगोले आणि ज्योती वाघाडे या शुक्रवारीच विमानाने थेट मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानी पोहोचल्या. तेथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राखी बांधून यवतमाळातील लाडक्या बहिणींकडून शुभेच्छा दिल्या. यवतमाळ जिल्ह्यातील लाडक्या बहिणींची ही माया अनुभवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भारावून गेले. बहिणींनी प्रमाने पाठविलेल्या या राख्या आणि शुभेच्छा पत्रे बघून त्यांनी दर्शना इंगोले यांच्या मोबाईलवरून पालकमंत्री संजय राठोड यांना थेट व्हिडीओ कॉल करून संवाद साधला व जिल्ह्यातील बहिणींना शुभेच्छा दिल्या.

शिवसेना महिला आघाडीने शुक्रवारी यवतमाळात रक्षाबंधन सोहळा साजरा केला. यावेळी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या वतीने उपस्थित भगिनींना विशेष पाहुणचार करण्यात आला. पालकमंत्री संजय राठोड यांच्यासह शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी लाडक्या बहिणींना आग्रहाने भोजन वाढले. भावांच्या या पाहुणचाराने उपस्थिती बहिणी भारावून गेल्या होत्या.

यवतमाळ येथील हा रक्षाबंधन सोहळा पार पडल्यानंतर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतिमेला बांधलेल्या राख्या व महिलांनी तयार केलेले शुभेच्छा पोस्टकार्ड घेवून शुक्रवारी सायंकाळी विमानाने मुंबईकडे रवाना झाल्या होत्या. तेथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी झालेल्या आदरातिथ्याने या भगिनी भारावून गेल्या. रात्री उशिरापर्यंत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी रक्षाबंधन सोहळा सुरू होता. यावेळी हजारो महिलांनी त्यांना राखी बांधण्यासाठी गर्दी केली होती. या प्रत्येक बहिणीशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपुलकीने संवाद साधत त्यांचे आदरातिथ्य केले. पालकमंत्री संजय राठोड यांच्या प्रोत्साहनामुळे थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राखी बांधण्याचे व ओवाळण्याचे सौभग्य लाभले, अशी भावना

पान १ वरून

**सांगलीत आज शिवराज काटकर .....**

आणि समाजाभिमुख पत्रकारितेची मोठी पावती मानली जात आहे. वार्ताहर म्हणून सुरू झालेला शिवराज काटकर यांचा पत्रकारितेचा प्रवास आज राष्ट्रीय नेतृत्वापर्यंत पोहोचला आहे. सत्तेला प्रश्न विचारणे, सामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे आणि सत्याशी तडजोड न करणे, ही त्यांच्या पत्रकारितेची ठळक ओळख राहिली आहे. तरुण भारतचे संपादक म्हणून त्यांनी वृत्तपत्राला आधुनिकतेची जोड देतानाच पत्रकारितेतील मूलभूत मूल्ये जपली आहेत. उद्याच्या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्यास अभिवादन करून होणार आहे. त्यानंतर विश्रामबाग ते कृष्णा मॅरेज हॉल अशी शोभायात्रा काढण्यात येईल. सकाळी ९.३० वाजता पत्रकार प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन होणार असून, सकाळी १० वाजता राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सभेनंतर शिवराज काटकर यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या पदग्रहणाचा मुख्य सोहळा होणार आहे. दुपारनंतर मुंबई प्रेस क्लबच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा तसेच सांगली जिल्ह्यातील संपादकांचा सत्कार करण्यात येणार आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पत्रकारांचा मेळावा, पत्रकारिता क्षेत्रातील बदलत्या आव्हानांवर चर्चा आणि पत्रकार प्रशिक्षण कार्यशाळेतील सहभागी पत्रकारांना प्रमाणपत्र वितरण असा दिवसभर कार्यक्रम होणार आहे. पत्रकार सुरक्षा, माध्यम स्वातंत्र्य, ग्रामीण पत्रकारांचे प्रश्न, डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव, फेक न्यूज आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बदलणारी पत्रकारिता अशा अनेक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर शिवराज काटकर यांच्या राष्ट्रीय नेतृत्वाकडून पत्रकारांना मोठ्या अपेक्षा आहेत. चार दशकांच्या निर्भीड पत्रकारितेची दखल म्हणून राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा स्वीकारणारे शिवराज काटकर आणि त्यांच्या पदग्रहणासाठी राज्यभरातून एकत्र येणारे ५०० हून अधिक पत्रकार, यामुळे सांगलीत उद्या मराठी पत्रकारितेच्या नव्या पर्वाचा ऐतिहासिक सोहळा रंगणार आहे.

पान ४ वरून

**पात्र शेतकरी योजनांच्या लाभापासून वंचित .....**

अडथळे निर्माण होत आहेत. या अडचणी दूर करून पात्र शेतकऱ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनाने विशेष कार्यवाही करावी, अशी मागणी काळे यांनी केली.

या सर्व प्रश्नांकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गांभीर्याने लक्ष देऊन संबंधित विभागांना तातडीने निर्देश द्यावेत. तसेच आवश्यक निधी उपलब्ध करून देत प्रलंबित कामांना गती द्यावी, अशी मागणीही खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली.

यावेळी आयोजित पत्रकार परिषदेला राजेंद्र राख, बदर चाऊस, नंदू जांगडे, कृष्णा पा. पडूळ, संजय मुथा, नरेंद्र मित्तल, सुनील चौधरी, अब्दुल हाफिज, संजय इंगळे, शेख वासिम, अशोक उबाळे, राजेंद्र गोरे, अविनाश चव्हाण, रघुवीर गुढे, सोपान तिरुखे, ज्ञानदेव इंगोले, वासिम पठाण, भागवत घाटे, कलीम खान, कल्याण तारडे आदी मान्यवर उपस्थित होते.

**ग्रामस्थांनी चांगली पिढी घडवयाची असेल तर ....**

ही शिक्षकांची असतात.तुम्ही जसे कर्म कराल तसे फळ मिळेल.मी जिवनात कधीही खोटं बोललो नाही.कधी कुणाचा व्देष मत्सर केला नाही.मी कुणाचा एक रुपयाही लबाडीने खाल्ला नाही.कोणतेही काम मी पत्नीला विचारुन केले म्हणुन तर मला जे मिळाले त्यात मी समाधानी आहे.माझे मुलं चांगल्या पदावर कार्यरत आहेत.मी गोरगरीबांच्या मुलांसाठी शिक्षणसंस्था सुरू केली आहे.माझे समाजसेवेचे काम अविरतपणे चालू राहणार आहे.या प्रसंगी पुणे येथिल उपायुक्त डॉ नितिन सानप, दिलिपराव जायभाये,अधिक्षक भविष्य निर्वाह निधी पुणे जमीर शेख,माजी शिक्षणाधिकारी भगवान सानप,माजी प्राचार्य सातपुते,नाईकवाडे सर यांची समोयच्चित भाषणे झाली.तर एस के सानप सर यांचे विद्यार्थी समर्थ जाधव,किरण यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.तर एसके सानप सर यांचे पहिली पासुन चे सर्व शिक्षक तांबारे सर,सातपुते,नाईकवाडे सर, पठाण सर यांचा व्यासपिठावर यथोचित सन्मान करुन सत्कार करण्यात आला.तर सानप यांच्या पत्नी मंगल नागरे सानप यांनी आपल्या पती विषयी भावना व्यक्त केल्या.या सेवानिवृत्ती कार्यक्रमात सुभाष सानप यांच्या वर प्रेमापोटी प्रमुख पाहुणे म्हणून हभप विघ्ने महाराज,हभप सांगळे,माजी जि प सदस्य मदन जाधव, रामदास बडे,खेडकर मामा,खरमाटे मामा, वसंतराव सानप सरपंच सुभाष क्षिरसागर, वैजनाथ मिसाळ,माजी सभापती तथा अध्यक्ष राजाभाऊ जाधव,माजी अध्यक्ष प्रकाश जाधव,माजी चेअरमन उध्दव मिसाळ,दिलिप मिसाळ, महारुद्र केकाण,चोपडे साहेब, प्रल्हाद धनगुडे, प्राचार्य परमेश्वर सानप सह सर्व कर्मचारी जालंदर विद्यालय, बाळासाहेब नागरे,मुराद पठाण,निजाम शेख सचिव,भरत जाधव,माजी सरपंच हाशमभाई शेख, ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर मंडलिक, प्रभाकर जाधव,माऊली सानप हिवरसिंगा, महादेव मिसाळ सर,मदन सोनवणे सर उध्दव परदेशी सर, कृष्णा विघ्ने प्रल्हाद विघ्ने यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षिका रायमोहा,हिवरसिंगा येथिल नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मु अ केडी सानप,के आर सानप,विकास डोळे, अशोक सानप, विघ्ने सर,सुभाष सांगळे, कुलकर्णी सर,खेडकर सर,यांनी परिश्रम घेतले तर प्रास्ताविक के डी सानप यांनी केले तर सुत्र संचालन तुपे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन व उत्कृष्ट संचलन केंद्रप्रमुख अनंत सानप सर यांनी केले.

**यशवंत विद्यालय वनगाव येथे ....**

दृढ करून परस्परांमध्ये प्रेम, आपुलकी, विश्वास व संस्कार निर्माण करण्याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. चांगले संस्कार आणि दृढ नातेसंबंध यांच्या माध्यमातून यशाकडे जाणारा मार्ग सुकर होतो, असा संदेशही त्यांनी दिला.राखी बांधण्याच्या कार्यक्रमामुळे विद्यार्थी–विद्यार्थिनींमध्ये मोठा उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. भारतीय संस्कृतीतील नातेसंबंध, प्रेम आणि संस्कार यांचा सुंदर मिलाफ घडवून आणणारा हा कार्यक्रम अत्यंत आनंददायी व संस्मरणीय ठरला.

**शेख आमेर सोहिल यांची स्टुडंट्स ऑलिम्पिक ...**

योगदान देत आहेत. विविध क्रीडा उपक्रम, स्पर्धा आणि विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यविकासासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांची या पदावर निवड करण्यात आल्याने शाळेच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे *अध्यक्ष राम सर, सचिव प्रा. विजय पवार सर, शाळेच्या प्राचार्या यास्मिन सय्यद, मुख्य समन्वयक भालचंद्र देशमुख तसेच सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा मूल्यांचा प्रसार, क्रीडा प्रतिभेला प्रोत्साहन तसेच विविध स्तरांवरील क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी शेख आमेर सोहिल निश्चितच प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

*शेख आमेर सोहिल यांच्या या निवडीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा!*

**कोमलवाडीच्या सुनेने कर्तृत्वाचा ....**

केले असून, आता गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्या पार पाडणार आहेत. शिक्षक म्हणजे केवळ नोकरी नव्हे, तर भावी पिढी घडविण्याची मोठी जबाबदारी. ही जबाबदारी स्वीकारण्याची संधी सौ. भाग्यश्री धनवडे यांना मिळाल्याने त्यांच्या यशाचे विशेष कौतुक होत आहे. त्यांच्या निवडीमुळे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच कोमलवाडी ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कोमलवाडी गावाने विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाची छाप उमटविली असून, आता शिक्षण क्षेत्रातही धनवडे कुटुंबीयांनी गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. भाग्यश्री धनवडे यांच्या या यशामुळे गावातील इतर तरुण–तरुणींनाही शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून पुढे जाण्याची प्रेरणा मिळणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सौ. भाग्यश्री शंकर धनवडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन होत असून, गोंदिया जिल्ह्यातील त्यांच्या आगामी शैक्षणिक सेवेसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

**आ. संग्राम जगताप, आ. नितीन पवार यांनी घेतले श्री ....**

करण्यात येणाऱ्या सुविधा तसेच परिसराच्या सुशोभीकरणाची त्यांनी माहिती घेतली.

मंदिराची उभारणी अत्यंत सुंदर आणि नियोजनबद्ध पद्धतीने आकार घेत असल्याचे पाहून मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. आगामी काळात श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड देवस्थान हे अधिक भव्य, आकर्षक आणि भाविकांसाठी सर्व सुविधांनी युक्त तीर्थक्षेत्र म्हणून विकसित होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी विश्वस्त आ. सुरेश धस यांनी देवस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी हाती घेतलेल्या विविध उपक्रमांची तसेच भव्य मंदिर जीर्णोद्धाराच्या कामाची सविस्तर माहिती आ. संग्राम जगताप व आ. नितीन पवार यांना दिली. भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचीही त्यांनी माहिती दिली.याप्रसंगी नानासाहेब पवार, बजरंग भाऊ घोडके, रविराज पुरी, प्रमोद चितळे, भाऊसाहेब पालवे, विनोद चन्ने यांच्यासह अन्य मान्यवर तसेच मोठ्या संख्येने भक्त–भाविक उपस्थित होते.

लोकनायक
रविवार दि ३० ऑगस्ट २०२६
३

# 'विमुक्त दिना'निमित्त सोमवारी मुंबईत न्याय, हक्क आणि विकास परिषद

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रमुख मार्गदर्शन





**लोकनायक वृत्तसेवा –** '१८ पगड जातींना' समाजकारण आणि राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना मान-सन्मान मिळवून दिला. हीच दूरदृष्टी जपत शिवसेना पक्ष मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देशभरातील भटके-विमुक्त (डीएनटी) समाजाला संघटित करून त्यांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रवाहात भक्कमपणे उभे करण्याचा निश्चय केला. ही जबाबदारी त्यांनी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्यावर सोपवली. यातूनच भटके-विमुक्तांच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प दृढ करत, मुंबईत सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी 'विमुक्त दिना'च्या निमित्ताने भटके - विमुक्त हक्क, न्याय व विकास परिषद आयोजित करण्यात आली आहे.

ब्रिटिश काळात १८७१ च्या 'क्रिमिनल ट्राइब्स ॲक्ट' नावाच्या जुलमी कायद्यामुळे अनेक भटके-विमुक्त जमातींवर गुन्हेगारीचा कलंक लादला गेला होता. स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये हा कायदा रद्द होऊन ३१ ऑगस्ट रोजी हा समाज खऱ्या अर्थाने विमुक्त झाला. या ऐतिहासिक 'विमुक्त दिना'चे औचित्य साधून, अखिल भारतीय शिव भटके-विमुक्त (डीएनटी) सेनेच्या वतीने 'शिवसेना भटके-विमुक्त हक्क, न्याय व विकास परिषद - २०२६' चे आयोजन सोमवार, ३१ ऑगस्ट रोजी मुंबई येथे श्री षण्मुखानंद सरस्वथी सभागृह, सायन येथे सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. या परिषदेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मुख्य मार्गदर्शन लाभणार आहे. परिषदेचे आयोजक व भटके - विमुक्त (डीएनटी) समाजाचे राष्ट्रीय नेते, मंत्री संजय राठोड यांच्यासह राज्यभरातील शिवसेनेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, खासदार, आमदार उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे, समाजातील उपेक्षित प्रश्नांवर प्रसिद्ध लेखक तथा डीएनटी अभ्यासक 'उपरा'कार लक्ष्मण माने, 'उचल्या'कार लक्ष्मण गायकवाड, डीएनटी फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय संयोजक दिगंबर राठोड हे विचारवंत आणि अभ्यासक परिषदेत सखोल मार्गदर्शन करणार आहेत.

शिवसेनेने तळागाळातील व वंचित घटकांना सत्तेच्या व समाजाच्या केंद्रस्थानी आणले. त्याच विचाराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भटके-विमुक्त समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा निश्चय करत या समाजाच्या राष्ट्रीय नेतृत्वाची धुरा मंत्री संजय राठोड यांच्याकडे सोपवली. त्यामुळे मुंबई येथे होत

असलेली ही परिषद केवळ औपचारिकता ठरणार नाही, असा विश्वास समाजबांधव व्यक्त करत आहे. भविष्यात या समाजाला आरक्षण, निवारा, रोजगार, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक स्थैर्य आणि योग्य राजकीय प्रतिनिधित्व कसे मिळवून देता येईल, याचा ठोस कृती आराखडा या परिषदेत तयार केला जाणार आहे.

### संस्कृतीचा जागर: 'भटके-विमुक्त लोककला संगम'

**हजारो समाजबांधवांच्या उपस्थितीत होणाऱ्या या परिषदेत महाराष्ट्रातील भटके-विमुक्त समाजाच्या पारंपरिक लोककला, दुर्मीळ वाद्ये आणि वेशभूषांचे थेट सादरीकरण होणार आहे. सुप्रसिद्ध लोककलावंत नंदेश उमप आणि त्यांचा संच 'भटके-विमुक्त लोककला संगम' हा सांस्कृतिक कार्यक्रम या सोहळ्यात सादर करणार आहेत. 'एकत्र येऊया... संघटित होऊया... हक्क, न्याय आणि विकासाची नवी दिशा घडवूया:' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेला महाराष्ट्रातील सर्व भटके-विमुक्त समाजबांधव, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने मुंबईत होणाऱ्या या परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन परिषदेचे आयोजक तथा अखिल भारतीय शिव भटके - विमुक्त (डीएनटी) सेनेचे राष्ट्रीय नेते संजय राठोड यांनी केले आहे.**


### टी सी हरवला आहे

फरहान फेरोज फारोखी रा केज ता केज या नावाचा १२ वी पासचा टी सी केज ते अंबाजोगाई प्रवासात हरवला आहे सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर सम्पर्क साधावा

मोबाईल नंबर ९५४५५०३०२०





# दैनिक 'वास्तव'चा अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठेचा 'रायटर अँड फायटर' पुरस्कार जाहीर

## निवासी संपादक अरविंद ओव्हाळ, वडवणी तालुका प्रतिनिधी अशोक फपाळ ठरले मानकरी

**लोकनायक वृत्तसेवा –** दैनिक 'वास्तव'चे निवासी संपादक अरविंद ओव्हाळ आणि वडवणी तालुका प्रतिनिधी अशोक फपाळ यांना यंदाचा अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठेचा असलेला 'रायटर अँड फायटर' पुरस्कार मुख्य संपादक जितेंद्र सिरसाट यांनी जाहीर केला आहे. या पुरस्काराचे वितरण 'वास्तव'च्या सभागृहात आणि मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये दिमाखदार सोहळ्यात आयोजित करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे असून मोठ्या थाटात आणि शानदार कार्यक्रमामध्ये पुरस्काराचे वितरण होणार असून पुरस्कार प्राप्त पत्रकारांना यथोचित गौरविण्यात येणार आहे.'रायटर अँड फायटर' हा पुरस्कार

कोणत्या पत्रकारांना दिला जातो? ज्या पत्रकारांची पत्रकारिता अत्यंत उत्तम तसेच सत्याचा शोध घेणारी, निष्पक्ष, आणि लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून जबाबदारी पार पाडणाऱ्या पत्रकारांना 'रायटर अँड फायटर'





हा दैनिक 'वास्तव'चा अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार दिला जातो. सदरील पुरस्कार प्राप्त पत्रकारांनी समाजातील प्रत्येक घटकाचा आवाज बनून तथ्यांवर आधारित आणि पारदर्शक माहिती लोकांसमोर मांडलेली पाहिजे. त्याचप्रमाणे बातमी देताना सत्यता, दुजाभाव न ठेवता केवळ खऱ्या पुराव्यांवर भर देत कोणत्याही दबावाखाली न येता वस्तुस्थिती जशीच्या तशी मांडणारे निर्भिड, निष्पक्ष पत्रकार असायला हवेत. विशेष म्हणजे आणखी एक महत्त्वाची बाब अशी की, या पत्रकारांना सामाजिक जबाबादारीचे भान असणे आवश्यक आहे.अरविंद ओव्हाळ, अशोक फपाळ ठरले यंदाचे मानकरीसत्तेवर असलेल्या यंत्रणा आणि सरकार यांच्या कामावर योग्य तो अंकुश ठेवण्याबरोबरच समाजातील उपेक्षित आणि सर्वसामान्य लोकांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम दैनिक 'वास्तव'चे निवासी संपादक अरविंद ओव्हाळ आणि वडवणी तालुका प्रतिनिधी अशोक फपाळ यांनी केले आहे. अरविंद ओव्हाळ आणि अशोक फपाळ हे त्या त्या भागामध्ये पत्रकारिता करत असताना त्यांनी सदैव खोट्या बातम्या किंवा दिशाभूल करणाऱ्या प्रचारापासून नेहमी दूर राहणे पसंत केले. एकूणच निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता करीत असताना ओव्हाळ आणि फपाळ यांनी आपली पत्रकारिता समाज हिताची आणि समाजाला नवी दिशा देण्यासाठी वाहून घेतलेली आहे. म्हणून त्यांना 'रायटर अँड फायटर' हा पुरस्कार जाहीर करण्यात आला.


## जाहीर नामा

दिवाणी चौकशी अर्ज क.१९६/२०२६

**श्री.एन.एम.वाली, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात**

१. संतोष पिता भालचंद्र भावठाणकर वय ४४ वर्षे धंदा खाजगी नौकरी रा अयोध्यानगर धारूर ता धारूर जि बीड
२. शांताबाई प्र भालचंद्र भावठाणकर वय ७४ वर्षे धंदा घरकाम व अयोध्यानगर धारूर ता धारूर जि बीड
३. सरिता व सतीश रूद्रवार वय ५५ वर्षे धंदाा घरकाम र पुजर्ळ पो पुजर्ळ ता औंवा नागनाथ जि हिंगोली
४. कविता भ्र वैजेनाथ कोम्मावार वय ५३ वर्षेधंदा घरकाम रा सव्हे नंबर ४१/१/९. प्लॅट नं सी-११०७, अमृतवेल अपार्टमेंट, एन डी ए रोड, ज्ञानेश स्ऑप जवळ, वारजे माळवाडी पुणे शहर वारजे पुणे
५. पुजा भ्र भिमाशंकर पारसेवार वय ४९ वर्षे धंदा घरकाम रा चौबारा रोड सराफ लाईन उदगीर ता उदगीर जि लातुर
६. सिमा भ्र विजय पारसेवार वय ४८ वर्षे धंदा घरकाम र चौबारा रोड सराफ लाईन उदगीर ता उदगीर जि लातुर

) अर्जदार

विरुध्द

**कोणीही नाही ) सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिरनामा/जाहिरनोटीस द्रवारे असे कळिवण्यात येते की,
ज्या पेक्षा मयत भालचंद्र पिता बाबाराव भावठाणकर रा. मौजे, धारूर ता चारूर जि
बीड याचे दिनांक २९/०३/२०२६ रोजी निधन झालेले आहे. त्याना अर्जदार हे कायदेशीर
वारसदार आहेत.
मयत भालचंद्र पिता बाबाराव भावठाणकर याचे पश्चात शासकिय निमशासकिय व इतर
कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार दे मगत भालचंद्र पिता बाबाराव भावठाणकर याचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस बाळा दरवासी हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वत अथवा या मैन्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलामार्फत हजर होउन लेखी अबता तोंडी हरकता योग्य त्या कागदोपत्री युव्यासह मे न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अजति कामी योग्य ती पुढील पुर्णता करुन पुरावा घेउन मै न्यायालयात अर्जदार यांचे नाचे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतफ्या जाणार नाहीत याची नोद घ्यावी.
आज तारीख १९/०८/२०२६ गोजी आमने सहीनिशी व न्यामालयाचे शिक्यानिशी दिला
प्रकरणात पुढील दिनांक २२/१०/२०२६

**क. लिपीक**

**हुकूमावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क स्तर, धारूर**



## जाहीर नामा

**श्री.एन.एम. वाली, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क१९५/२०२६
निशाणी क.८/क

१. लक्ष्मण पिता विश्वनाथ गायकवाड वय ४२ वर्षे धंदा शेती र धारूर ता भारूर जि बीड
२. रामेश्वर पिता विश्वनाथ गायकवाड वय ३८ वर्षे धंदा शेती य धारूर ता धारूर जि बीड
३. आनंत पिता विश्वनाथ गायकवाड वय ३४ वर्षे धंदा शेती रा धारूर ता धारूर जि बीड
४. प्रभावती भ्र विश्वनाथ गायकवाड वय ५६ वर्षे धंदाा घरकाम व शेती रा बारूर ता धारूर जि बीड
५. पल्लवी भ्र गोविंद शिंदे वय ३२ वर्षे धंदा घरकाम व शेती रा राडी ता अंबाजोगाई जि बीड

) अर्जदार

विरुध्द

**कोणीही नाही ) सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिरनामा / जाहिरनोटीस द्रवारे असे कळिवण्यात येते की, ज्या पेक्षा मयत विश्वनाथ पिता श्रीरंग गायकवाड रा. मौजे, धारूर ता धारूर जि बीड
बांचे दिनांक २०/०३/२०२३ रोजी निधन झालेले आहे. त्याना अर्जदार है कायदेशीर वारसदार
आहेत
मयत विश्वनाथ पिता श्रीरंग गायकवाड यांचे पश्चात शासकिय निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मचत विश्वनाथ पिता श्रीरंग गायकवाड याचे कायदेशीर वारस असल्याचे पोषीत करुन नारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार गांस बारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि आहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या में न्यायालयात प्रत्यक्ष अदवा वकिलामार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य ती पुराव्यासह में नायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, हार अर्जाचे कामी योग्य ती पुढील पूर्तता करुन पुरावा पेउन मे न्यायालयात आमदार यांचे नावे वारस दीवला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या होणार नाहीत याची नोद घ्यावी.
आज तारीख १९/०८/२०२६ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला
प्रकरणात पुढील दिनांक २१/१०/२०२६

**क. लिपीक**

**हुकूमावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क स्तर, धारूर**



## जाहीर नामा

**श्री.एन.एम.वाली, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क.२०३/२०२६
निशाणी क.१०/

रामेश्वर पिता रंजित बांगर वय ४२ वर्षे धंदा शेती रा सारूकवाडी पौ मैदवाडी ता धारूर जि बीड, ह.मु. पुणे १.
मंगल भ्र रंजीत बांगर वय ६० वर्षे धंदाा घरकाम रा सारूकवाडी पो मैदवाडी ता धारूर जि बीड २.

) अर्जदार

विरुध्द

**कोणीही नाही ) सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिरनामा/जाहिरनोटीस द्रवारे असे कळिवण्यात येते की, ज्या पेक्षा मयत रंजीत पिता ज्ञानदेव बांगर य. मौजे सारूकवाडी पौ मैदवाडी ता.धारुर जि.बीड यांचे यांचे दिनांक २१/०७/२०२६ रोजी निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत.
मयत रंजीत पिता ज्ञानदेव बांगर यांचे पश्चात शासकिय/निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मयत रंजीत पिता ज्ञानदेव बांगर यांचे कायदेशीर वारस असल्याचे पोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यानी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलामार्फत हजर होउन लेखी अववा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अजर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावा घेउन में प्रायर्यालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी
आज तारीख २४/०८/२०२६ रोजी आमचे सहीनिशी के न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.
प्रकरणात पुढील दिनांक: २७/१०/२०२६

**क. लिपीक**

**हुकूमावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क स्तर, धारूर**


# वर्षावास अधिष्ठान निमित्त पूज्य भंतेजी 'चंद्रप्रभाव ' महाथरो यांचे श्रावण पौर्णिमा निमित्त धम्म चारीका संपन्न

**लोकनायक वृत्तसेवा –** सत्यशील बूद्ध विहार खा-परखेडा येथे दिनांक २८ ऑगस्ट २०२६ शुक्रवार ला सकाळी०९.३०वाजता श्रावण पौर्णिमा निमित्त पूज्य भंतेजी चंद्रप्रभाव महाथेरो यांचे हस्ते तथागत बुद्ध तसेच राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णकृती पूतळ्याला पूष्प अर्पण करण्यात आले .आणि लगेचच भंतेजी यांची नगरामध्ये धम्म चारीका सूरवात केली ' चरत भिक्खवे चारीका' हि धम्मगाथा म्हणत चारीका केली. ११.०० वाजता चारीका संपले नतंर विहारात प्रस्थान केले.यानंतर विहारामध्ये उपस्थित उपासक /उपासिका यांचे भोजनदान झाले. दूपारी १२.३० वाजता भंतेजी यांनी, २४ आरे धम्म सूत्त, पठ्ठान पाठ सूत्त, धम्म चक्क परिवर्तन सूत्त, परित्राणपाठाचे पठन करण्यात आले.त्यानंतर भंतेजी यानी आपल्या धम्मदेशनेत श्रावण पौर्णिमेचे आपल्या बूद्ध धम्मात काय महत्व आहे यावर प्रकाश टाकला.याच पौर्णिमेला (डाकू)अंगूलीमाल बूद्धास शरण आल्यावर महान भिक्खू झाला. प्रथम धम्म संगितीचा आरंभ याच श्रावण पौर्णिमेला झाले. हि प्रथम संगिती न ऊ महीने चालली असे भंतेजी यांनी आपले



सम्यक वाणितून धम्मदेशना दिली.

नगरातील संपूर्ण बौद्ध उपासक /उपासिकांनी पांढरे शूभ्र वस्त्र परिधान करून उपस्थिती दर्शविली त्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजक भारतीय बौद्ध महासभा शाखा खापरखेडा, भारतीय बौद्ध महासभा महिला मंडळ शाखा खापरखेडा यांनी केले होते

loknayak 30.08.2026 Copy:Copy of Layout 1 8/30/2026 12:03 AM Page 4



# महिला मोर्चाची ताकद वाढवा; प्रत्येक घरापर्यंत भाजपाचा विचार पोहोचवा - भास्कर दानवे यांचे आवाहन

**लोकनायक वृत्तसेवा** –भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाची संघटनात्मक ताकद अधिक बळकट करून पक्षाचा विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करावे, असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले.

भाजपा महिला मोर्चा जालना महानगराच्या संघटनात्मक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, जालना महानगर प्रभारी कल्पनाताई डांगे आणि भाजपा महिला मोर्चा जालना महानगर जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महिला मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संघटनात्मक मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे आदी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान जालना महान-गरातील विविध मंडळांच्या महिला मोर्चा अध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. नवीन जालना मंडळाच्या अध्यक्षपदी स्नेहा राजेश जोशी, जुना जालना मंडळाच्या अध्यक्षपदी दिपाली दिलीप बिनीवाले, पूर्व जालना मंडळाच्या अध्यक्षपदी रश्मी शशिकुमार टेकवाणी आणि महानगर ग्रामीण मंडळाच्या अध्यक्षपदी सुषमा गजानन खरात




यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी भास्कर आबा दानवे यांनी महिला मोर्चाची भूमिका पक्षाच्या संघटनात्मक कार्यात अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. प्रत्येक मंडळात महिला कार्यकर्त्यांचे मजबूत संघटन उभे करून बूथ पातळीपर्यंत पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवावी. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचवून त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महिला कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा. महिला मोर्चाची ताकद वाढवून भाजपाचा विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कल्पनाताई डांगे यांनी महिला मोर्चाच्या माध्यमातून पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने सक्रियपणे काम करण्याची गरज व्यक्त केली. बूथ पातळीपर्यंत महिला संघटन मजबूत करून अधिकाधिक महिलांना पक्षाच्या विचारांशी जोडावे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचवून त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महिला कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

शुभांगीताई देशपांडे यांनी नवनियुक्त मंडळ अध्यक्षांचे अभिनंदन केले. जालना महान-गरातील प्रत्येक मंडळ आणि बूथ पातळीवर महिला मोर्चाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करायचे आहे. महिलांना संघटनेशी जोडतानाच त्यांना नेतृत्वाची संधी देऊन पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी महिला मोर्चा प्रभावीपणे कार्य करेल, असे त्यांनी सांगितले.

नवनियुक्त मंडळ अध्यक्ष स्नेहा राजेश जोशी, दिपाली दिलीप बिनीवाले, रश्मी शशिकुमार टेकवाणी आणि सुषमा गजानन खरात यांनी पक्षाने सोपविलेल्या जबाबदारीबद्दल आभार व्यक्त केले. महिला कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटन मजबूत करणे, पक्षाच्या विविध उपक्रमांमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे तसेच शासनाच्या लोककल्याणकारी योजना महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

बैठकीस सिद्धिविनायक मुळे, सुनील पवार, संजय डोंगरे यांच्यासह भाजपा महिला मोर्चाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्या आणि असंख्य महिला उपस्थित होत्या.

## पात्र शेतकरी योजनांच्या लाभापासून वंचित राहू नयेत : खासदार डॉ. कल्याण काळे

**लोकनायक वृत्तसेवा**

विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेल्या शेतकऱ्यांना केवळ कागदपत्रे, ओळख क्रमांकातील तांत्रिक अडचणी अथवा जमीन वर्ग-२च्या कारणामुळे लाभापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी शासनाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली.जमीन वर्ग-२



च्या कारणामुळे अनेक पात्र शेतकरी विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहत आहेत. तसेच कागदपत्रांमधील त्रुटी, ओळख क्रमांकाशी संबंधित तांत्रिक अडचणी यामुळेही पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळण्यात **पान २ वर**

## ग्रामस्थांनी चांगली पिढी घडवयाची असेल तर प्राथमिक शाळे कडे लक्ष देणे गरजेचे - सेवानिवृत्त शिक्षक सुभाष सानप

## रायमोह येथे सुभाष सानप यांची सेवानिवृत्ती

**रायमोह लोकनायक वृत्तसेवा** – शिक्षण प्रक्रिया हि अत्यंत सोपी गोष्ट असुन त्यासाठी शिक्षकांनी स्वतः अंगटाकुण काम केले पाहिजे.तर चांगली पिढी घडवयाची असेल तर ग्रामस्थांनी गावातील प्राथमिक शाळा व शिक्षणाकडे लक्ष देणे काळाची गरज आहे.असे प्रतिपादन रायमोहा येथिल सेवानिवृत्ती कार्यक्रमात सुभाष सानप यांनी केले कार्यक्रमाच्या अ ध्य क्ष स्था ना ी गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे हे होते.

शिरुर तालुक्यातील रायमोह येथिल जि प केंद्रीय शाळेतील शिक्षक सुभाष सानप हे वयनियतमाने सेवानिवृत्त झाले.त्यापित्यर्थ रायमोहा येथे भव्यदिव्य सेवानिवृत्त कार्यक्रम आयोजित केला होता.या कार्यक्रमासाठी शिरुर तालुक्यातील सर्व पक्षिय पदाधिकारी कार्यकर्ते सामाजिक कार्यकर्ते शिक्षक शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.आपल्या सत्कारास उत्तर देताना सुभाष सानप यांनी सर्वांचे ऋण व्यक्त करुन मी उसतोडणी मजुराचा मुलगा अत्यंत गरीबी तुन शिक्षण घेतले आहे.मी तीन वर्ष पुणे जिल्ह्यातील खेड्यात नोकरी केली या तीन वर्षात प्रत्येक घरुन जेवणाचा डबा होता.मी भंडारा डोंगराजवळील गावात असताना तेथील स्थानिक लोकांच्या मधुकरी खाल्ली.माझा स्वभाव असा आहे कि मी जिथे जाईल तेथिल परिसराचा होत असतो.शिक्षण प्रक्रिया हि अत्यंत सोपी गोष्ट आहे.त्यासाठी शिक्षकांनी शिक्षणकामी योगदान दिले पाहीजे.ज्या शाळेत तुम्ही आहात त्या गावाचे झाले पाहिजे शाळा गाव व गावातील सर्व कार्यक्रम, गावकऱ्यांचे सुखदुःख **पान २ वर**

## यशवंत विद्यालय वनगाव येथे राखी पौर्णिमा उत्साहात संपन्न

**लोकनायक वृत्तसेवा** – यशवंत विद्यालय, वनगाव येथे शनिवार, सकाळी १० वाजता भारतीय संस्कृतीमध्ये अतिशय महत्त्वाचे स्थान असणारा राखी पौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वाता-वरणात संपन्न झाला.या कार्यक्रमादरम्यान अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करून राखी





पौर्णिमेचे महत्त्व, भारतीय संस्कृती आणि बहीण-भावाच्या पवित्र नात्याची परंपरा याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी राखी पौर्णिमेशी संबंधित विविध आनंददायी प्रसंग व आठवणीही सांगितल्या.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. अशोक जगताप सर, तसेच श्री. नामदेव घोडके सर, श्री. ज्ञानेश्वर कोकाटे सर आणि श्री. विकास भोसले सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बहीण-भावाचे नाते अधिक **पान २ वर**

## शेख आमेर सोहिल यांची स्टुडंट्स ऑलिम्पिक असोसिएशन, बीड शहर जिल्हा निरीक्षकपदी निवड

**लोकनायक वृत्तसेवा** – विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेले सी.बी.एस.ई.बोर्डाची नामांकित ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल, सोमेश्वर नगर, बार्शी रोड, बीड येथील उत्कृष्ट क्रीडा शिक्षक शेख आमेर सोहिल यांची स्टुडंट्स ऑलिम्पिक असोसिएशन, बीड शहर यांच्या जिल्हा निरीक्षकपदी निवड करण्यात





आली आहे.

स्टुडंट्स ऑलिम्पिक असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने दिनांक २८ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या अधिकृत पत्राद्वारे सन २०२६-२७ या कालावधीसाठी बीड शहर संघटनेची संलग्नता निश्चित करण्यात आली असून, त्यानुषंगाने शेख आमेर सोहिल यांच्यावर जिल्हा निरीक्षक म्हणून महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

शेख आमेर सोहिल हे ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलमध्ये क्रीडा शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय **पान २ वर**

## कोमलवाडीच्या सुनेने कर्तृत्वाचा झेंडा गोंदिया जिल्ह्यात फडकवला!

### भाग्यश्री धनवडे यांची जिल्हा परिषद शाळेवर शिक्षिका म्हणून निवड

**लोकनायक वृत्तसेवा** – गेवराई तालुक्यातील कोमलवाडी गावचे सुपुत्र श्री. शंकर सूर्यकांत धनवडे यांच्या पत्नी सौ. भाग्यश्री शंकर धनवडे यांची गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेवर शिक्षिका म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे धनवडे कुटुंबीयांसह संपूर्ण कोमलवाडी गावाच्या



शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. ग्रामीण भागातून आलेल्या सौ. भाग्यश्री धनवडे यांनी आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शिक्षण क्षेत्रात शासकीय सेवेत दाखल होण्याचे स्वप्न त्यांनी पूण **पान २ वर**

## आ. संग्राम जगताप, आ. नितीन पवार यांनी घेतले श्री मच्छिंद्रनाथांचे दर्शन

### आ. सुरेश धस यांनी केले स्वागत; भव्यदिव्य मंदिर जीर्णोद्धाराच्या कामाची पाहणी

**लोकनायक वृत्तसेवा** – श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड देवस्थान, सावरगाव (मायंबा) येथे शनिवारी अहिल्यानगरचे आमदार संग्राम भैय्या जगताप आणि नाशिक आमदार नितीनराव पवार यांनी भेट देत श्री मच्छिंद्रनाथ महाराजांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी देवस्थान परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.





श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड देवस्थानचे विश्वस्त तथा आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी आ. संग्राम जगताप व आ. नितीन पवार यांचे देवस्थानमध्ये स्वागत केले. मान्यवरांनी श्री मच्छिंद्रनाथ महाराजांच्या चरणी नतमस्तक होत दर्शन घेतले.

यानंतर अहिल्यानगरचे आ. संग्राम जगताप व नाशिकचे आ. नितीन पवार यांनी देवस्थान परिसरात सुरू असलेल्या भव्यदिव्य मंदिर जीर्णोद्धार व उभारणीच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. मंदिराचे भव्य स्वरूप, सुरू असलेली विविध विकासकामे, भाविकांसाठी निर्माण **पान २ वर**


## सुचना

दैनिक बीडचा **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल लोकनायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.











This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com